# अहवाल

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमांतर्गत 'लेखक - वाचक संवाद' उपक्रम

15 जानेवारी 2025 रोजी महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमांतर्गत 'लेखक - वाचक संवाद' उपक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ कवी प्राध्यापक एकनाथ पाटील यांनी विद्यार्थ्यांना वाचन संस्कृतीचे महत्व विशद केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले वाचनाने माणसाचे आयुष्य समृद्ध होते. 'सोशलमिडियाने माणसांचे आयुष्य गिळंकृत केले आहे. त्यामुळे विचार आणि कल्पनाशक्ती खुंटली आहे. माणसं सैरभैर झाली आहेत. वाचन हा या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचा प्रभावी मार्ग आहे. वाचनाने माणसांचे आयुष्य समृद्ध होते. ऐन संकटाच्या काळात ग्रंथ जीवनाला दीशा देतात.' असे प्रतिपादन कवी एकनाथ पाटील यांनी केले. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले, 'ज्या समाजात सातत्याने ग्रंथनिर्मिती होते, त्या समाजाचे भवितव्य उज्जवल असते. विचारांच्या बळावर असा समाज दीर्घकाळ टिकून राहतो आणि एका सकारात्मक संस्कृतीची निर्मिती करतो.' यावेळी प्रा.हरीश वसावे, प्रा. संतोष खडसे प्रा. राहूल पाटील उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे स्वागत प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रकाश आठवले यांनी व आभार प्रा. संदीप पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी थोरात यांनी केले.








# सोशल मीडियातून बाहेर पडण्यासाठी वाचन प्रभावी माध्यम : पाटील

प्रतिनिधी
इस्लामपूर

'सोशल मीडियाने माणसांचे आयुष्य गिळंकृत केले आहे. त्यामुळे विचार आणि कल्पनाशक्ती खुंटली आहे. माणसं सैरभैर झाली आहेत. वाचन हा या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचा प्रभावी मार्ग आहे. वाचनाने माणसांचे आयुष्य समृद्ध होते. ऐन संकटाच्या काळात ग्रंथ जीवनाला दिशा देतात, असे प्रतिपादन कवी एकनाथ पाटील यांनी केले.

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमांतर्गत 'लेखक– वाचक संवाद' उपक्रमात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, 'ज्या समाजात सातत्याने ग्रंथनिर्मिती होते,

इस्लामपूर : लेखक एकनाथ पाटील समवेत प्रा. संदीप पाटील, प्रा. राहूल पाटील.

त्या समाजाचे भवितव्य उज्जवल असते. विचारांच्या बळावर असा समाज दीर्घकाळ टिकून राहतो आणि एका सकारात्मक संस्कृतीची निर्मिती करतो. डॉ.प्रकाश आठवले यांनी प्रास्ताविक केले. प्रा.संदीप पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अश्विनी थोरात यांनी केले. यावेळी डॉ.संतोष खडसे, प्रा.हरीश वसावे, प्रा.राहूल पाटील व विद्यार्थी उपस्थित होते.